# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे

४ ब, बी.जे. रोड, पुणे – ४११००१
दुरध्वनी क्र.: (०२०) २६१३३८३३, २६१३९३००

*** पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित,पुणे ***

**जाहिरात**

*** शिपाई पदाची सरळसेवा भरती – २०२६***

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे यांना शिपाई हुद्दयाची २८९ रिक्त पदे ऑफलाईन पध्दतीने सरळसेवा लेखी परीक्षेद्वारे भरणेकरिता फक्त पुणे जिल्हयातील मूळ रहिवासी असलेल्या पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत, याबाबत माहिती खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | बँकेच्या संकेतस्थळावर परीक्षा शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरणे | दि. ०४/०८/२०२६ सकाळी ११.०० वाजेपासून ते दि. १०/०८/२०२६ रोजी रात्री २३.५९ वाजेपर्यंत. |
| २. | ऑफलाईन परीक्षा दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |
| ३. | ऑफलाईन परीक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. |
| ४. | कागदपत्रे पडताळणी व मुलाखत दिनांक | ऑफलाईन परीक्षा निकालानंतर बँकेच्या संकेतस्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. (बँकेचे संकेतस्थळ:https://www.pdcc.bank.in/careers आणि https://www.punedccbank.com) |

*** सूचना ***

१) पुणे जिल्ह्यातील मूळ रहिवासी असणाऱ्या उमेदवारांकरीता १००% पदे प्राधान्याने भरण्यात येणार आहेत.

२) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज दाखल करताना मूळ रहिवासी प्रमाणपत्र (अधिवास प्रमाणपत्र –Domicile Certificate) व आधारकार्ड अपलोड करणे बंधनकारक आहे.

३) उमेदवारांनी अपलोड केलेल्या अधिवास प्रमाणपत्राची (**Domicile Certificate**) छाननी कागदपत्रे पडताळणीच्या वेळी करण्यात येईल.

४) लेखी परीक्षा शुल्क भरल्याशिवाय रजिस्ट्रेशन/नोंदणी प्रक्रिया पुर्ण होणार नाही.

५) उमेदवारांना लेखी परीक्षा शुल्काची रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरणा करता येईल.

६) ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवाराने स्वतःचा **ई-मेल आयडी,** मोबाईल क्रमांक व आधार क्रमांक अचुक भरणे आवश्यक आहे अन्यथा अर्ज माहिती अभावी अपात्र होईल.

७) उमेदवारांनी अर्ज भरताना शिपाई पदासाठी आवश्यक पात्रता धारण केली असल्याची खात्री करुनच अर्ज भरावा.

८) **भरती प्रक्रियेबाबतची सविस्तर अद्ययावत माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर माहितीचे वेळोवेळी अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.**

९) **बँकेने शिपाई पदाच्या सरळसेवा भरती जाहिरातीमध्ये नमूद केलेली पदसंख्या, पात्रता निकष व निवड प्रक्रिया कार्यपध्दती इत्यादीमध्ये बदल करण्याचा अधिकार बँकेचा असून सदर बदल उमेदवारांवर बंधनकारक राहील.**

..२

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित मुख्य कचेरी ४-बी,बी.जे.रोड पुणे-१.

१) पदसंख्या वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता :-

| पदाचे नाव | पदसंख्या | वयोमर्यादा | आवश्यक शैक्षणिक अर्हता | इतर आवश्यक अर्हता |
|---|---|---|---|---|
| शिपाई | २८९ | किमान १८ वर्षे ते कमाल ३८ वर्षे | उमेदवार किमान उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एच.एस.सी. – इयत्ता १२ वी) उत्तीर्ण असावा किंवा १२ वी समकक्ष पदवीका (Diploma) उत्तीर्ण असावा. | उमेदवार पुणे जिल्हयातील किमान १५ वर्षे पासूनचा रहिवासी असावा. |

१. वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हता दि. ०१.०८.२०२६ रोजीपर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.

२. बँकेत कंत्राटी तत्वावर नियुक्त विविध एजन्सीमार्फत सलग एकाच संस्थेत दि. ०१.०८.२०२६ अखेर सलग किमान ३ वर्षे कामकाजाचा अनुभव असलेल्या उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा अट ४३ वर्षापर्यंत शिथिल राहील.

३. पुणे जिल्हयातील मूळ रहिवासी असलेबाबत सक्षम प्राधिकरणाने दिलेला सक्षम पुरावा सादर करणे बंधनकारक राहील. **(सन २०१८ नंतरचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate))**

४. पुणे जिल्हयाबाहेरील मूळ रहिवासी असलेल्या विवाहित महिला उमेदवारांच्या बाबतीत त्यांच्या पतीचे पुणे जिल्हयातील मूळ अधिवास प्रमाणपत्र आणि सक्षम प्राधिकरणाचा विवाह नोंदणी प्रमाणपत्रक सादर करणे बंधनकारक राहील.

५. उमेदवार शिपाई पदाचे शारीरिक हालचालीचे कामकाज करणेकरीता शारीरिक दृष्टया सक्षम/सदृढ असणे आवश्यक आहे.

६. शिपाई पदांची पदसंख्या कमी करण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवलेला आहे.

७. सदर भरती प्रक्रिया कोणत्याही कारणाशिवाय कोणत्याही टप्प्यावर थांबविणे किंवा रद्द करण्याचे अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत.

८. उमेदवारास महाराष्ट्र नागरी सेवा नियम २००५ नुसार प्रतिज्ञापन (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) बंधनकारक राहील.

९. बँकेस कोणत्याही प्रकारचे समांतर आरक्षण लागू नाही.

**२) परीक्षा शुल्क :**

परीक्षेकरीता रक्कम रू. १६५०/– (अधिक १८% जी.एस.टी. व सर्व्हिस चार्ज) परीक्षा शुल्क आकारले जाईल. सदर परीक्षा शुल्क हे ना परतावा राहील. एकदा भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाही किंवा कोणत्याही परीक्षेसाठी किंवा निवडीसाठी राखीव ठेवता येणार नाही.

**३) परिविक्षाधीन कालावधी व पगार :**

| | |
|---|---|
| शिपाई | निवड करण्यात आलेल्या पात्र उमेदवारांना सहा महिन्याच्या तात्पुरत्या परिविक्षाधीन (प्रोबेशनरी) कालावधीसाठी बँकेच्या सेवेत नेमणूक दिली जाईल. नेमणूक दिलेल्या उमेदवारास परिविक्षाधीन कालावधीमध्ये रू.१२,०००/– (रूपये बारा हजार फक्त) दरमहा एकवट पगार देण्यात येईल. सदर उमेदवारास नेमणूकी बाबत बँकेच्या कर्मचारी स्थायी आदेशातील व कर्मचारी सेवानियमावलीतील प्रचलित नियम, अटी व शर्ती लागू राहतील. |

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित मुख्य कचेरी ४-बी,बी.जे.रोड पुणे-१.

..३

**४) वेतन श्रेणी :**

| | |
|---|---|
| शिपाई | १९५-१०-२२५-१२-२८५-१४-३५५-१६-४३५-१९-५३०-२४-६५०-२९-७९५-३४-९६५-३४-१०००-३४-११७० |
| | बँकेच्या नियमानुसार लागू असणारे भत्ते व सुविधा. |

**५) निवड कार्यपध्दती :**

५.१. **ऑफलाईन परीक्षा :**

५.१.१. शिपाई पदाकरीता ७० गुणांची ओ.एम.आर. (Optical Mark Recognition) पध्दतीने ऑफलाईन परीक्षा घेण्यात येईल.

५.१.२. लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची राहील.

५.१.३. लेखी परीक्षेचे माध्यम मराठी राहील.

५.१.४. लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत ७० प्रश्नांचा समावेश राहील व प्रत्येक प्रश्नास १ गुण राहील.

५.१.५. लेखी परीक्षेकरीता एकूण ७५ मिनिटांचा कालावधी राहील.

५.१.६. लेखी परीक्षेसाठी खालील विषयांच्या विस्तृत अभ्यासक्रमावर आधारित प्रश्नांचा समावेश राहील.

| अ.क्र | विषयाचे नाव | गुण |
|---|---|---|
| १ | शेती पतपुरवठा त्रिस्तरीय रचनेची प्राथमिक माहिती | २० |
| २ | बँकिंग व सहकार | १५ |
| ३ | सामान्य ज्ञान व चालू घडामोडी | १५ |
| ४ | कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्था | १० |
| ५ | बुध्दिमापन चाचणी | १० |
| | **एकूण** | ७० |

५.२. **कागदपत्रे पडताळणी :**

५.२.१. लेखी परिक्षेत प्राप्त होणाऱ्या गुणांच्या गुणानुक्रमे रिक्त पदांच्या १:३ प्रमाणानुसार मुलाखतीस पात्र उमेदवारांची आसन क्रमांक निहाय **(गुण क्रमांक निहाय नाही)** यादी बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

५.२.२. पात्र उमेदवारांची मुलाखतीपूर्वी आवश्यक शैक्षणिक अर्हता व इतर संबंधीत मूळ प्रमाणपत्रकांची प्राथमिक कागदपत्रे पडताळणी बँक अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येईल.

५.२.३. कागदपत्र पडताळणीवेळी उमेदवाराने मूळ कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. प्राथमिक कागदपत्रे पडताळणीमध्ये पात्र होणारा उमेदवारच बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीस पात्र राहील.

५.३. **मुलाखत :**

५.३.१. कागदपत्रे पडताळणीमध्ये पात्र झालेल्या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येईल. परंतु, उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहील्यास तो अंतिम निवडीस अपात्र ठरेल.

५.३.२. मुलाखत ३० गुणांची राहील. उमेदवारांचे व्यक्तिमत्व, शारीरिक क्षमता, संवाद कौशल्य, बँकेची प्राथमिक माहिती, पुणे जिल्हयाचे स्थानिक ज्ञान, सेवावृत्ती, सहकारातील मुलभूत तत्वे व शिष्टाचार इत्यादी बाबी विचारात घेऊन मुलाखतीस ३० पैकी गुण देण्यात येतील.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित मुख्य कचेरी ४-बी, जे. रोड पुणे-१.

५.४. **अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी :**

५.४.१. उमेदवाराचे लेखी परीक्षेतील गुण व मुलाखतीतील सरासरी गुणांची बेरीज करून एकत्रिकरण एकूण १०० गुणांच्या गुणानुक्रमे अंतिम निकाल जाहिर करण्यात येईल व रिक्त पदांच्या २०% प्रमाणे उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल.

५.४.२. सदर अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर प्रतिक्षा यादीचा कालावधी हा अंतिम निवड यादी जाहिर झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षापर्यंत राहील.

५.४.३. अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करताना दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण प्राप्त झाल्यास प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी अनुक्रमे १) वयाची ज्येष्ठता, २) अनुभव ३) आडनावाच्या इंग्रजी अक्षरांनुसार क्रम विचारात घेण्यात येईल.

५.४.४. अंतिम निवड सूचीतील उमेदवारांना बँकेच्या प्रचलित अटी शर्तीनुसार नियुक्ती देण्यात येईल.

**६) उमेदवारांसाठीच्या महत्वाच्या सूचना :**

६.१. उमेदवाराने अर्जात भरलेली माहिती किंवा जोडलेली कागदपत्रे खोटी, बनावट अथवा दिशाभूल करणारी असल्याचे आढळल्यास किंवा कोणतीही महत्वाची माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

६.२. उमेदवारांनी भरती प्रक्रियेकामी कोणत्याही पदाधिकारी/अधिकारी यांचेकडून शिफारस/दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास सदर उमेदवारास कोणत्याही टप्प्यावर अपात्र घोषित करुन निवड प्रक्रियेतून बाद केले जाईल.

६.३. लेखी परीक्षेनंतर पात्र उमेदवारांना मुलाखतीपूर्वी कागदपत्रे पडताळणीसाठी बोलविले जाईल.

६.४. उमेदवारांना लेखी परीक्षा, कागदपत्रे पडताळणी व प्रत्यक्ष मुलाखतीस स्वःखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

६.५. यापूर्वी बँकेकडे याच पदासाठी (ऑनलाईन, ई–मेल, टपाल व हस्ते पोहोच) अर्ज केले असतील तर त्यांचे पूर्वीचे अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत. त्यांना भरती प्रक्रियेकरीता नव्याने ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

६.६. भरती प्रक्रियेत/निवड कार्यपद्धतीत बदल करण्याचा अधिकार बँकेस असेल व ऐनवेळी काही बदल झाल्यास तो स्थानिक वर्तमानपत्रात/बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला जाईल. याबाबत अर्ज केलेल्या उमेदवारांना वैयक्तिक स्वरुपात कळविले जाणार नाही.

६.७. उमेदवाराचा पुणे जिल्हयातील किमान १५ वर्षे अधिवास असणे आवश्यक आहे. पुणे जिल्हयातील मूळ रहिवासी असलेबाबत सक्षम प्राधिकरणाने दिलेला सक्षम पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

**(सन २०१८ नंतरचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate))**

६.८. उमेदवाराची लेखी परीक्षा प्रामुख्याने पुणे शहरातील परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल. मात्र आवश्यकते नुसार जिल्हयातील इतर केंद्रावरही परीक्षा घेतली जाईल. तसेच उमेदवारांची संख्या विचारात घेऊन परीक्षा एकापेक्षा अधिक सत्रामध्ये घेण्यात येईल.

६.९. उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

६.१०. बँकेने सदर भरती प्रक्रिया तसेच परीक्षेसंदर्भातील मार्गदर्शनासाठी कोणत्याही पब्लिकेशन एजन्सीची/युटयूब चॅनेल/टेलिग्राम चॅनेल यांची नियुक्ती केलेली नाही. याबाबत कोणतीही जाहिरात अगर माहिती ही बेकायदेशीर आहे, असे समजण्यात यावे.

..५

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित
मुख्य कचेरी
४-बी,पी.जे.रोड
पुणे-१.

६.११. काही अपरिहार्य/आपत्कालीन कारणास्तव परीक्षा स्थगित करणे/पुढे ढकलणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार बँकेस असतील.

६.१२. भरती प्रक्रियेसंदर्भात उद्‌भवणारे वाद/तक्रारीबाबत बँकेचा निर्णय अंतिम राहील.

६.१३. सदर भरती प्रक्रिये अंतर्गत शासनाकडील वेळोवेळीच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन करण्यात यावे.

६.१४. सदर भरती प्रक्रियेबाबत काही वाद उद्‌भवल्यास त्याचे अधिकारक्षेत्र केवळ पुणे न्यायालय (Pune Jurisdiction) हेच राहील.

**७) ऑनलाईन अर्ज व लेखी परीक्षेचे शुल्क भरण्याची कार्यपद्धती :**

७.१. शिपाई पदाच्या सरळसेवा भरतीकरिता बँकेच्या https://www.pdcc.bank.in/careers आणि https://www.punedccbank.com या अधिकृत संकेत स्थळावरुन ऑनलाईन पद्धतीनेच अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई–मेल आय.डी. व मोबाईल क्रमांक चुकीचा/अपुर्ण असल्यास तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर (DND) असल्यामुळे संपुर्ण प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. त्याचप्रमाणे ई–मेल आयडी व संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना बँक जबाबदार राहणार नाही. **सदर भरती प्रक्रिये दरम्यान बँकेच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या भरती प्रक्रियेच्या अद्ययावत माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवारांची असेल.**

७.२. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्र व पुरावे जोडणे आवश्यक नाही. तथापी ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्याच्या पात्रतेनुसार काळजीपुर्वक संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. सदर पात्रतेबाबतच्या खोटया माहितीच्या आधारे ऑनलाईन अर्ज दाखल केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारांवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात येईल. **ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना काही चुकी झाल्यास किंवा त्रुटी राहिल्याने भरतीच्या कुठल्याही टप्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची असेल व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्जात एकदा भरलेली माहिती बदलता येणार नाही.** विस्तृत माहितीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा इ. बाबतची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

७.३. उमेदवारांची लेखी परीक्षा ही ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या तात्पुरत्या गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्व तपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या फक्त गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. लेखी परीक्षेच्या प्राथमिक चाळणीनुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी करण्यात येईल. कागदपत्राच्या पूर्ण छाननी केल्यानंतरच उमेदवाराची पुढील टप्प्यासाठी पात्रता निश्चित करण्यात येईल. सदर छाननी प्रक्रियेत अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. नमूद पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवाराला भरतीच्या कोणत्याही टप्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

७.४. उमेदवारांना एका पेक्षा जास्त अर्ज दाखल करता येणार नाही. तसेच एका पेक्षा जास्त अर्ज दाखल करणारा उमेदवार आढळल्यास अशा उमेदवाराचा अर्ज छाननी प्रक्रियेत अपात्र करुन निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

..६

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित मुख्य कचेरी ४-बी, बी.जे.रोड पुणे-१.

७.५.ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना बँकेच्या https://www.pdcc.bank.in/careers आणि https://www.punedccbank.com या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. सदर ऑनलाईन अर्ज व सविस्तर सूचना संकेतस्थळावर लेखी परीक्षा शुल्क स्वीकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत खुले असेल.

७.६.**ऑनलाईन अर्ज भरताना येणारा अडचणींचे निराकरण help@punedccbank.com या ई–मेलद्वारे व ८७९३६७५९०४ या हेल्पलाईनद्वारे करण्यात येईल. सदर हेल्पलाईन सकाळी ०७.०० वा. ते सायं. ०७.०० वा. सुरू असेल.**

७.७.**परीक्षा शुल्क भरणे : ऑनलाईन पध्दतीने.**

लेखी परीक्षा शुल्काची रक्कम ही फक्त ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येईल. लेखी परीक्षा शुल्क स्वीकारण्याची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे.

१) UPI, डेबिटकार्ड (Rupay/Visa/Master Card/Maestro), क्रेडिट कार्ड, इंटरनेट बँकिंग, मोबाईल वॉलेट (Gpay, Phone Pe, Bhim App इ.) वापरून परीक्षा शुल्क स्विकारण्यात येईल.

२) परीक्षा शुल्क जमा झाल्यानंतर व्यवहार यशस्वीरित्या पूर्ण झाल्यावर ई–पावती तयार होईल. सदर ई–पावती तयार झाल्यानंतर आपला व्यवहार यशस्वीरित्या पुर्ण झाला आहे, असे गृहीत धरावे.

३) उमेदवारांनी ई–पावती आणि फी तपशील असलेल्या ऑनलाईन अर्जाची प्रत प्रिंट करून घेणे आवश्यक आहे.

७.८.लेखी परीक्षा शुल्काचा भरणा हा परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम तारेखपर्यंत सुरु राहील. **परीक्षा शुल्क भरलेले उमेदवारच लेखी परीक्षेस पात्र राहतील.**

७.९.**उमेदवाराने सर्वप्रथम संकेत स्थळावरील विस्तृत माहिती व सूचनांचे अवलोकन करून त्यानंतर (NEW REGISTRATION) ऑनलाईन या बटनावर क्लीक (Click) करावे.** ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतर परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने (Payment Gateway) भरणा करून अर्ज आणि परीक्षा शुल्क भरणा केल्याची प्रत स्वतः जवळ पदभरती प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत उमेदवाराने जतन करून ठेवणे आवश्यक आहे.

७.१०. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वतःचे अद्यावत ३.५ सें.मी. × ४.५ सें.मी. आकारातील **"JPG/JPEG"** या प्रकारामध्ये स्कॅन केलेले छायाचित्र (फोटो) व पांढऱ्या कागदावर काळ्या शाईच्या पेनाने स्वतः स्वाक्षरी करुन स्कॅन केलेली १.५ सें.मी. × ३.५ सें.मी. आकारातील **"JPG/JPEG"** प्रकारची स्वाक्षरी स्कॅन करुन https://www.pdcc.bank.in/careers आणि https://www.punedccbank.com या संकेत स्थळावरील सूचनेनुसार विहीत पद्धतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. छायाचित्र (फोटो) स्कॅन केलेल्या इमेजची फाईल साईज २० के.बी. ते ५० के.बी. च्या मध्ये असावी. तसेच स्वाक्षरीच्या स्कॅन केलेल्या इमेजची फाईल साईज १० के.बी. ते २० के.बी.च्या मध्ये असावी.

७.११. उमेदवाराने ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना स्वतःचे अधिवास प्रमाणपत्र व आधार कार्ड **"JPG/JPEG"** या प्रकारामध्ये स्कॅन करुन https://www.pdcc.bank.in/careers आणि https://www.punedccbank.com या संकेत स्थळावरील सूचनेनुसार विहीत पद्धतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. अधिवास प्रमाणपत्र व आधार कार्ड स्कॅन केलेल्या इमेजची साईज २० के.बी. ते ५० के.बी च्या मध्ये असावी.

७.१२. ऑनलॉईन अर्ज आणि परीक्षा शुल्क भरण्याच्या अंतिम तारखेनंतर संकेतस्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद करण्यात येईल.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित मुख्य कचेरी ४-बी,बी.जे.रोड पुणे-१.

..७

७.१३. लेखी परीक्षेची माहिती उमेदवारास ई–मेल/एस.एम.एस. द्वारे कळविण्यात येईल. तसेच लेखी परीक्षेचे प्रवेश पत्र, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती व विविध सुचना या केवळ बँकेच्या https://www.pdcc.bank.in/careers आणि https://www.punedccbank.com या संकेतस्थळावर उपलब्ध होतील, सदर माहिती पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाही. सदर भरती प्रक्रिये दरम्यान बँकेच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येणारी भरती प्रक्रियेची अद्ययावत माहिती अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील उमेदवारास परीक्षेचे प्रवेशपत्र ऑनलाईन पद्धतीने डाऊनलोड करता येईल. त्यासाठी उमेदवारांनी त्यांचा अर्ज भरताना रजिस्ट्रेशन नंबर, युजर आयडी व पासवर्ड भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित
मुख्य कचेरी
४-बी, बी.जे.रोड
पुणे-१.

(स्वाक्षरी)

प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी